# जिल्हा परिषद,यवतमाळ

कार्यालय,शिक्षण विभाग,प्राथमिक

दुसरा माळा, प्रशासकीय इमारतआर्णी रोड ,, यवतमाळ

E-mail – eopriytl@gmail.com दुरध्वनी क्र.07232 244295-


जा/क्र.शिवि/प्राथ/लेखा / १२८ /२०२४यवतमाळ दिनांक:- १४/०५/२०२४

**प्रति,**

1) **गटशिक्षणाधिकारी**
**पंचायत समिती..........( सर्व)**

2) **मुख्याध्यापक**
**जि.प.माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय .......(सर्व)**

**विषय:- शिक्षकांचे वेतनाचे खाते क्र व IFSC कोड DDO-3 (शिक्षणाधिकारी) लॉगिन वरुण बदल करणे बाबत.**

**संदर्भ:- १) शिक्षण संचालनालय पुणे यांचे पत्र क्र.शिसंमा/टि-७/शालार्थ/वेतन/ ई-कुबेर/२०२१ दि.०५/०४/२०२४**

उपरोक्त संदर्भिय पत्राच्या अनुषंगाने आपणास सुचित करण्यात माहे एप्रिल २०२४ पासुन शिक्षकांचे वेतन हे SBI CMP ऐवजी RBI( Reserve Bank Of India) द्वारा संचलित E-Kuber प्रणाली मार्फत सुरु झाले आहे. या पुर्वी शिक्षकांचे खाते बदल करुण **DDO-2 (गटशिक्षणाधिकारी )** लॉगिन वरुण अप्रोवल करण्याची सुविधा होती. परंतु सदर सुविधा आता **DDO-3 (शिक्षणाधिकारी) लॉगिन** ला उपलब्द करुण देण्यात आलेली आहे.

त्या नुसार शिक्षकांचे वेतनाचे व्हाउचर एंट्री झाल्यानंतर ते बिल जनरेट करण्यापुर्वी या कालावधित सबंधित शिक्षकाने विनंती केल्यास बँक खाते क्रमांक बदल करण्यात यावा. त्याकरिता सबंधित शिक्षकांचा विनंती अर्ज बँक पासबुक झेरॉक्स आणि जिल्हा परिषद प्राथमिक शिक्षकांच्या बाबतीत गट शिक्षणाधिकारी यांचे पत्र व जिल्हा परिषद माध्यमिक शिक्षकांच्या बाबतीत सबंधित मुख्याध्यापक यांचे पत्र प्रत्यक्ष लेखा शाखा (शिक्षण विभाग प्राथमिक) जिल्हा परिषद, यवतमाळ येथे सादर करुण खाते क्रमांक बदल करुण अप्रोवल घेण्यात यावे.

यानतंर एकाही शिक्षकाने जिल्हा कार्यालयाची पुर्वपरवानगी घेतल्या शिवाय आपल्या वेतनाचा बँक खाते क्रमांक व IFSC कोड बदल करु नये. तसेच देयक Forward केल्यानंतर एकाही शिक्षकांनी वेतन अदा होईपर्यंत आपले शाखा बदल करू नये याबाबत अधिनस्त सर्व शिक्षकांना आपले स्तरावरून सुचित करण्यात यावे.वारंवार सुचना देऊनसुद्धा शिक्षक आपले शाखा बदल करत आहेत व त्यामुळे वेतन जमा होण्यास अडचणी होत आहेत. तसेच सदर पत्र डाकेतुन किंवा व्हाट्सअप पाठविण्यात येउ नये.प्रत्यक्ष लेखा शाखेत सादर करावे.

उपरोक्त सुचनांचे वेतनाचे खाते बदल करणे बाबत काटेकोरपणे पालन करण्यात यावे.

**(प्रकाश मिश्रा)**
**शिक्षणाधिकारी (प्राथ)**
**जिल्हा परिषद यवतमाळ**

**प्रतिलिपी:-**

1) मा.मुख्य कार्यकारी अधिकारी , जिल्हा परीषद यवतमाळ यांना माहितीस्तव सविनय सादर.
2) मा.मुख्य लेखा व वित्त अधिकारी , जिल्हा परीषद यवतमाळ यांना माहितीस्तव सविनय सादर.